MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Issue-45, Vol-07, Jan. to March 2023

Editor
Dr.Bapu G. Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

**Jan. To Mar. 2023**
**Issue 45, Vol-07**

**Date of Publication**
**01 Feb. 2023**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# INDEX

01) Impact of Lockdown on Different Sectors in India
**Dr. Vijaykumar R. Soni, Latur** ||10

02) Entrepreneurship and Rural Development
**Dr. Vinod Barde, Dist-Bhandara** ||13

03) TOTAL QUALITY MANAGEMENT IN ACADEMIC LIBRARIES
**Dr. Hemraj Duryodhan Chopkar, Dist. Jalna** ||16

04) Use of Smartphone Technology in College Library Services: Need of the Hour
**Jitendra R. Gavit, Dist-Palghar (MS)** ||19

05) Liberation of Dalit women and Baba Sahib Bhim Rao Ambedkar
**Dr. Amarjit Lal, Hamirpur (HP) India** ||21

06) Right to healthfor children's
**Dr.MALIKA PARVIN, BIKANER** ||27

07) Lokkatha'78: A Fine Illustration of Folk Elements
**Dr. Manisha Mohan Mujumdar, Dist-Sindhudurg (Maharashtra)** ||30

08) A Post colonial Study of Aravind Adigas The Last Man Tower
**Raibhole Pradip Marotirao, Dist- Nanded, Tq Bhokar** ||37

09) CONTRAST AND COMPARE BETWEEN THE NOVEL 'NINETEEN EIGHTY – FOUR'AND ...
**Sandip S. Shirsat, Tal/Dist Ratnagiri, Maharashtra** ||43

10) मराठी जैन संत साहित्य
**प्रा. अंशुमती राजेंद्र काहाणे, जि. अमरावती** ||50

11) 'फास' कादंबरी आणि शेतकऱ्यांचे जीवन
**प्रा.संदीप कोरडे , जि.नांदेड** ||52

12) क्रांतीसिंह नाना पाटील यांची स्वातंत्र्य लढ्यातील भूमीका
**प्रा.डॉ.शिवाजी लक्ष्मण नागरगोजे, जि.बीड** ||55

13) समाज सुधारक महात्मा जोतीराव फुले
प्रा. भोजराज व्ही. बोदेले, जि. भंडारा ||56

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

10

# मराठी जैन संत साहित्य

**प्रा. अंशुमती राजेंद्र काहाणे**
मराठी विभाग प्रमुख ( सहयोगी प्राध्यापिका ),
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी जि. अमरावती

***********

कोटयवधी वर्षांपूर्वी पृथ्वीवर सजीव सृष्टीचा उदय झाला. हया सजीव सृष्टीचा उत्क्रांत आविष्कार म्हणजे मानवप्राणी, प्रारंभीच्या काळात गुहेत राहणाऱ्या, रानावनातील कंदकुळे, फळे खाऊन जगणाऱ्या मानवप्राण्याने आपले जगणे, आपले तगणे सुलभ करण्यासाठी विविध शोध लावले. आपले जीवन सुखी, समाधानी, आनंदी करण्यासाठी विविध संस्थांची निर्मिती केली. धर्म ही त्यातीलच एक महत्वाची संस्था होय. धर्म म्हणजे सुखी, समाधानी, आनंदी जीवन जगण्याचे साधे, सोपे, सुटसुटीत असे आचरणयोग्य नीतिनियम, त्या त्या काळाच्या, परिस्थितीच्या गरजेनुसार हे नीतिनियम ठरवले गेले. हे नीतिनियम ठरवणारे प्रेषित, संस्थापक, महापुरुष हे त्या त्या धर्मांचे प्रणेते म्हणून ओळखले जाऊ लागले. त्या प्रणेत्यांनी स्थापन केलेल्या धर्मांची विचारसरणी, आचारसरणी ही नंतरच्या काळात लिखित स्वरुपात अस्तित्वात आली. त्यांनाच आपण धर्मग्रंथ म्हणतो. आज जगामध्ये ख्रिश्चन, मुस्लिम, हिंदू, बौध्द, शीख, जैन, अवेस्ता हे धर्म अस्तित्वात आहेत. जगातील नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त मानव आपापल्या धर्मांचे नाव अभिमानाने सांगतात. यातील काही धर्म हे बहुसंख्याक आहेत तर काही धर्म हे अल्पसंख्याक आहेत. यातीलच जैन हा धर्म जगामध्येच नव्हे तर भारतातदेखील अल्पसंख्याक धर्म म्हणून ओळखला जातो.

सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी भारतात बौध्द धर्माचा उदय झाला. बौध्द धर्माचे संस्थापक भगवान गौतम बुध्द आणि जैन धर्माचे प्रणेते भगवान महावीर हे दोघे तसे समकालीन आहेत. मात्र भगवान महावीर हे जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकार आहेत. भगवान महावीरांच्या अगोदर जैन धर्मामध्ये तेवीस तीर्थंकर होऊन गेले. याचाच अर्थ असा, जैन धर्मांचा उदय हा बौध्द धर्मांच्या कितीतरी अगोदर झाला आहे. एखादया धर्मांचे अस्तित्व टिकून राहण्यामध्ये त्या त्या धर्माच्या तत्वज्ञानाचे योगदान हे फार मोलाचे असते. हे तत्वज्ञान निर्माण करणाऱ्या महापुरुषांचा हया तत्वज्ञानाचा प्रसार करणाऱ्या प्रसारकांचा आणि हया तत्वज्ञानामध्ये कालानुरुप बदल करणाऱ्या प्रसारकांचा आणि हया तत्वज्ञानामध्ये कालानुरुप बदल करणाऱ्या सुधारकांचा वाटाची तितकाच मोलाचा असतो.

भारतीय भूमीत उदयाला आलेल्या जैन धर्माचे आपल्या तत्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी त्या त्या प्रदेशातील लोकभाषांचा केलेला स्वीकार हे एक आगळेवेगळे वैशिष्टय आहे. आज तरी जैन धर्म हा अल्पसंख्याक धर्म म्हणून ओळखला जात असला तरी भारतातील प्रमुख भाषांमध्ये हया धर्माचे तत्वज्ञान समाविष्ट आहे. ''भाषेच्या बाबतीत जैनांचा दृष्टिकोन अगदी विज्ञानवादी आहे. भाषा ही मानवनिर्मित आहे. त्यामुळे कोणतीही भाषा ही श्रेष्ठ किंवा कनिष्ट मानण्याचे कारण नाही: म्हणूनच जैनांनी व बौद्धांनी साहित्यासाठी लोकभाषांचा स्वीकार केला . . .जैन साहित्यिकांनी कालमानाप्रमाणे अर्धमागधी, शौरसेनी, महराष्ट्री, अपभ्रंश, हिंदी, गुजराथी, राजस्थानी, तमीळ, कन्नड, मराठी इत्यादी सर्व भाषांचा उपयोग धर्मप्रसारासाठी केला.'' (पृष्ट क्र. २२, जैन साहित्य व संस्कृती, संप. विलास संगवे.)

प्राचीन मराठीतील जैन साहित्य - सध्या उपलब्ध असलेल्या प्राचीन जैन ग्रंथाची भाषा ही अर्धमागधी आहे. हया भाषेलाच डॉ. पिशेल हे पाश्चात्य भाषाशास्त्रज्ञ 'जैन महाराष्ट्री' असे म्हणतात. हया महाराष्ट्री भाषेचा उपयोग पहिल्यांदा जैन साहित्यिकांनी आपल्या ग्रंथलेखनासाठी केला. शके ९०५ म्हणजेच इ.स. ९८३ मध्ये (सध्याच्या) कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील सुमारे ५८ फूट उंचीच्या गोमटेश्वर भगवान बाहुबलीच्या मूर्तीच्या डाव्या चरणाजवळ कोरलेला मराठातील पहिला शिलालेख हा जैनांचा आहे.

''श्री चावुण्डराये करविले। श्री गंगराजसुताले करवियले।। '' हे त्या शिलालेखातील जगप्रसिध्द वाक्य असून मराठीचे प्राचीन अस्तित्व शोधणाऱ्या संशोधकांना हया जैनधर्मीय साधनाचा अधिक उपयोग झाला आहे. ''नेमिनाथ भवांतर या काव्याचे संपादक व उस्मानिया विदयापीठातील मराठीचे प्राध्यापक डॉ. श्री.रं. कुलकर्णी यांना 'मराठीचे बाल्यकाळातील लालन-पालन जैन साधुसंतांच्या मेळाव्यात झाले असावे', असे वाटते. (पृष्ठ क्र.२३, २४ तीर्थंकर पंचकल्याणिकोत्सव कथा, संपा. महावीर कंडारकर, प्राचार्य श्रीधर हेरवाडे)''

मध्ययुगीन मराठी साहित्य आणि जैन मराठी साहित्य - मध्ययुगामध्ये (म्हणजेच संत ज्ञानेश्वरांच्या नंतर) संपूर्ण भारतामध्ये सर्वत्र भक्तीच्या लाटा सर्वत्र उसळत होत्या. दक्षिण भारतात आलवार

संत, कर्नाटकात लिंगायत संत, बंगालमध्ये चैतन्य प्रभु, गुजरातमध्ये नरसी मेहता, उत्तर भारतामध्ये कबीर, सूरदास, तुलसीदास, राजस्थानमध्ये मीराबाई, महाराष्ट्रात संत नामदेव, तुकाराम वगैरे भक्त कवींनी संपूर्ण भारतास भक्तिरसात बुडवून टाकले होते. पण नंतरच्या काळात ही सगुण-निर्गुण भक्ती शृंगाराधिष्टित बनली. महाराष्ट्रातही संतकाव्यानंतर श्रीधरपंडित, वामनपंडित, रघुनाथपंडित, मोरोपंत यांच्या काव्यातून शृंगाररसाचाच परिपोष अधिक प्रमाणात झाल्याचे आढळते. पण याच काळात विदर्भ-मराठवाडयात मात्र जैन कवी अध्यात्माचे व भक्तीचेच मळे फुलवीत राहिले.

**मध्ययुगीन मराठी जैन साहित्याची विविधता :-**

मराठी जैन साहित्याच्या उपलब्ध इतिहासात ब्रम्हगुणदास हा (इ.स. १४५०) पहिला ग्रंथकार मानला जातो. `श्रेणिकचरित्र' हा ब्रम्हगुणदासाचा ग्रंथ प्रसिध्द आहे. यानंतर गुणकीर्ति नावाच्या आचार्यांनी धर्मामृत, पद्मपुराण, रुक्मिणीमहरण, रामचंद्र फाग असे विविध ग्रंथ रचले. गुणकीर्तिने फाग हा गुजराती साहित्यप्रकार मराठीत आणला. गुणकीर्तिने चरित्रात्मक लेखनही केले आहे. सोळाव्या शतकात पंडित मेघराज, कामराज, सूरिजन, नागोआया, गुणनंदी असे मान्यवर ग्रंथकार होऊन गेले. सतराव्या शतकातील कवींमध्ये वीरदास यांचे महत्व अनन्य साधारण आहे. `सुदर्शनचरित्र' हा त्यांचा सर्वात मोठा काव्यग्रंथ आहे. याच शतकात दामापंडित, मानकीर्ति, दयासागर, चिमनापंडित वगैरे कवींनी मराठी जैन साहित्यात मोलाची भर घातली. याच शतकात ब्रम्हपुण्यसागर, विशालकीर्ती, देवेंद्रकीर्ती, पद्मकीर्ती, महिचंद्र हे आणखी काही कवी होऊन गेले.

अठराव्या शतकातील मराठी जैन साहित्याचा विकास हा भट्टारक पीठांच्या आश्रयाने झाल्याचे दिसून येते. या काळात मराठवाडयात मोठया प्रमाणात साहित्यनिर्मिती झाली. `कालिकापुराण' हा या काळातील एक महत्वाचा ग्रंथ मानला जातो. या ग्रंथात एकूण ४८ अध्याय आणि सुमारे ७००० ओव्या आहेत. या ग्रंथाला मध्ययुगीन मराठी जैन समाजाच्या स्थित्यंतराचा इतिहास मानला जातो. या ग्रंथाविषयी डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे म्हणतात, ``तत्कालीन धार्मिक, सामाजिक व राजकीय इतिहास समजून घेण्यास कालिकापुराण हे एक महत्वाचे साधन आहे. मुसलमान राज्यकर्त्यांनी दक्षिणदेश जिंकला आणि इकडील धर्म बुडविला. याचा परिणाम जैन समाजावर कोणता झाला हे या पुराणात चांगलेच दिसून येते.'' (पृष्ट क्र. ७८, प्राचीन मराठी जैन साहित्य, लेखक-सुभाषचंद्र अक्कोळे) या ग्रंथाचे लेखन देवेंद्रकीर्ती यांनी केले आहे. याच शतकात जिनसागर आणि जनार्दन हे महत्वाचे कवी होऊन केले.

श्री ब्रम्हमहतिसागर यांचे जीवन व कार्य - १९ व्या शतकातील एक महत्वाचे जैन मराठी संतकवी म्हणून ब्रम्हमहतिसागर यांचा उल्लेख केला जातो. इ. १७७२ ते १८३२ हा त्यांचा जीवनकाल. विदर्भ - मराठवाडा हा त्यांच्या जन्मभूमीचा परिसर. त्या काळी त्या भागातील जैन समाज हा तसा मागासलेलाच होता. लोकांना स्वधर्माची पुरेशी ओळख नव्हती. अशा परिस्थितीत महतिसागरांनी धर्मजागृतीचे काम सुरु केले. पदे, अभंग, आरत्या, व्रतकथा या माध्यमातून लोकांना धर्माची, अध्यात्माची गोडी लावली. कीर्तन, पर्व, समारंभ अशा धार्मिक कार्यक्रमांतून अज्ञानी जनांना उपदेश केला. संबोध सहस्त्रपदी, चोवीस तीर्थंकरांच्या पंचकल्याणिकोत्सव कथा, अभंग, पदे अशा अनेकविध स्वरूपात त्यांनी रचना केल्या. पाणी गाळून पिणे, रात्री भोजन न करणे, मधु-मदय-मांस वर्ज्य मानणे, हिंसेचा भाव मनात न आणणे, एवढेच धर्माचे स्वरूप असल्याचा समज सर्वसामान्य जैन समाजात रूढ झाला होता. हया गोष्टी धर्माचरण म्हणून तर अत्यावश्यक होत्याच. परंतु हया पलीकडे जाऊन जैन धर्माचा विश्वकल्याण साधणारा व्यापक आशय समजावून सांगण्याचे फार महत्त्वाचे कार्य श्री ब्रम्हमहतिसारग यांनी एकोणिसाव्या शतकाच प्रारंभी केल्याचे आढळून येते.

**समारोप** - पुराणकथा, चरित्रकथा, ऐतिहासिक कथा, खंडकाव्य, चंपूकाव्य, चुर्णिका, पूजापाट, आरत्या, पदे अशा विविध साहित्यप्रकारांचा अवलंब करून जैनांनी मध्ययुगीन मराठी साहित्यात वैविध्य आणले पण या बरोबरीनेच प्रतिकूल परिस्थितीत धर्माचे अस्तित्व टिकवण्याचे, खराखुरा धर्मविचार सांगण्याचे मौलिक कार्य मराठी जैन साहित्यिकांनी केले असल्याचे आढळून येते. अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, अनेकान्तवाद, ब्रम्हचर्य या तत्त्वांची जपवणूक आणि प्रसार करण्याचे कार्य मराठी जैन साहित्यिकांनी अतिशय चिकाटीने केले आणि अशा प्रकारे भारतीय संस्कृतीचे संवर्धन करण्यात मोलाचा वाटा उचलला.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. शहा सुमतिबाई, पूर्णार्ध्य प्रकाशन, सोलापूर, द्वि. आवृत्ती, जून १९९९.

२. अक्कोळे सुभाषचंद्र, प्राचीन मराठी जैन साहित्य, सुविचार प्रकाशन, नागपूर, प. आवृत्ती १९६८.

३. संगवे विलास, जैन साहित्य आणि संस्कृती, शिवाजी विदयापीठ प्रकाशन, कोल्हापूर, प.आ. २०००.


४. शहा धनंजय, म.वा.इतिहास, खंड ७, भाग १, म.सा.प.पुणे, प.आ. २००९.

५. वालचाळे अलका, मराठी जैन साहित्य : स्वरूप आणि आकलन, पैठणी प्रकाशन, औरंगाबाद, २०१२.

६. जैन ऐतिहासिक भाग १, अन्नदाते श्रेणिक, सुमेरू प्रकाशन, एप्रिल २००२.

७. आगळे सिद्धार्थ, धर्म आणि साहित्य, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प.आ. जाने. २०१२.

❑❑❑




www. विद्यावार्ता® .कॉम
YouTube Channel



IMPACT FACTOR 9.154 iijif

₹ 400/-


Publisher & Owner

Archana Rajendra Ghodke

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra)
vidyawarta@gamil.com

Edit By

Dr. Gholap Bapu Ganpat
Parli Vaijnath, Dist.Beed 431 515

ISSN-2319 9318